# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 08/05/2023 (सोमवार) सायंकाळ

---

### अवैध रेतीचा साठा करणाऱ्या इसमांविरूद्ध

### पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांची कारवाई

मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांनी दिलेल्या आदेशावरून परि. सहायक पोलीस अधीक्षक श्री अनिल म्हस्के, परि. पोलीस उपअधीक्षक श्री. राहुल झालटे, पोलीस निरीक्षक सतीश सोनटक्के आणि नायब तहसीलदार संदीप डाबेराव यांचेसह महसूल विभागाचे अधिकारी यांनी अवैध रेतीचा साठा ठेवणाऱ्या इसमांविरूद्ध संयुक्त कारवाई करून पोस्टे खापा हद्दीतील रामडोंगरी परीसरात दिनांक ७/०५/२०२३ रोजी सकाळी ६ वाजता रेड टाकुन राम डोंगरी परिसरात सुमारे ३१२ ब्रास रेतीचा अवैध साठा जप्त केला. काही साठा हा झुडपी जंगल जमिनीवर आढळून आला तसेच काही साठा हा खाजगी जागेवर आढळून आलेला आहे. सदर साठा हा जप्त करण्यात आलेला आहे व पुढील कायेदशीर कारवाई करीता तहसिल कार्यालय खापा यांच्या ताब्यात देण्यात आले.



# घरफोडी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत शिव नगर मौदा येथे दिनांक ०६/०५/२०२३ चे २१.३० वा. ते ०७/०५/२०२३ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— संतोष बाळकृष्ण श्रावणकर, वय ४२ वर्ष, रा. शिव नगर मौदा हे दि. ०६/५/२०२३ चे २१/३० वा. चे रात्री दोघेही पती पत्नी हे नाईट डयुटी करिता दरवाज्याला कुलुप लावुन गेले असता दि. ०७/५/२०२३ चे ६/०० वा. घरी परत आले असता दरवाज्याचा कुलुप तुटलेला दिसला. फिर्यादीच्या घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते व पत्नीचे पर्स मध्ये ठेवलेले १) १ तोळा गरसुळी १ नग किंमती अंदाजे ३०,०००/—रू २) कानातले टॉप्स ४ ग्रॅम चे २ नग किंमती अदाजें ३०००/—रू ३) सोन्याची अंगठी ५ ग्रॅम १ नग किंमती अंदाजे ७०००/— रू ४) सोन्याची नथ २ ग्रॅम १ नग किंमती अदाजें २०००/—रू ५) सोन्याचे लोकेट १ ग्रॅम १ नग किंमती अदाजें १०००/— रू. व नगदी १०,०००/— रू असा एकुण ५३,००० रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशि ब. नं. १८८५ मो क्र. ८८३०५३२५६१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही** :— अंतर्गत २५ किमी अंतरावर मौजा पाचगाव येथे दिनांक ०४/०५/२०२३ ते दिनांक ०६/०५/२०२३ चे १२.०० वा. चे रात्री सुमारास फिर्यादी नामे— रूपेश भिमरावजी पांडे, वय ३६ वर्ष, रा. लोणी ता. वरूड जि. अमरावती ह. मु. प्लॉट न. ५४ सरस्वती नगर उदय नगर नागपुर यांच्या जिटीएल कपंनीचे टावर सन २०१३ पासुन मौजा पाचगाव येथे बंद अवस्थेत असुन त्यावर जुन्या २४ सेल बॅटरी अंदाजे किंमती २०,०००/—रू लागलेले असुन यातील अज्ञात आरोपीने सेल रूमचे लॉक तोडुन २४ सेल बॅटरी अंदाजे किंमती २०,०००/—रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरी करून घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. ४८५ बन्सोड मो. नं. ८६७३६०८६४२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**